दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com



● वर्ष : ०२ ● अंक : १९४ ● पुणे ● सोमवार, दि. १६ जून २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313

# इंद्रायणी नदीवरील पूल कोसळला

## रविवार असल्याने पर्यटकांची मोठी गर्दी ; वाहून गेलेल्यांमध्ये लहाण मुलांचाही समावेश ; पर्यटकांच्या सुरक्षेसाठी कोणतीही उपाययोजना नाही

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मावळ तालुक्यात एक धक्कादायक घटना घडली असून तळेगाव दाभाडे शहराजवळील प्रसिद्ध पर्यटनस्थळ कुंडमळा येथे इंद्रायणी नदीवर असलेला जूना पूल कोसळला आहे. त्यामध्ये अनेक पर्यटक इंद्रायणी नदीमध्ये बुडाले असून 20 ते 25 जण वाहून गेल्याची भीती व्यक्त केली जात आहे. यामध्ये काही लहाण मुलांचाही समावेश असल्याची माहिती आहे. यामध्ये तिघांचा मृत्यू झाला असून मृतांच्या आकड्यात वाढ होण्याची शक्यता आहे.

पुण्यातील मावळमध्ये कुंडमळ्यात पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पर्यटक गर्दी करतात. त्यातच या ठिकाणचा पूल कोसळला. ही घटना रविवारी 3.30 वाजण्याच्या सुमारास घडल्याचं सांगण्यात येत आहे. घटनास्थळी पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयातील तळेगाव दाभाडे पोलिस दाखल झाले आहेत. कुंडमळा नदी ओलांडण्यासाठी, या बाजूवरून दुसऱ्या बाजूला जाण्यासाठी पूल आहे. हाच पूल कोसळला आहे.









रविवार असल्याने मोठ्या संख्येने पर्यटक त्या ठिकाणी उपस्थित होते. काही जण पुलावर उभारले होते. तेव्हा हा पूल कोसळल्याने ही दुर्घटना घडली आहे. यामध्ये नेमके किती जण बुडाले आहेत हे अद्याप स्पष्ट होऊ शकलं नाही. अंदाजे 20 ते 25 जण बुडाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे.

कुंडमळा या ठिकाणी इंद्रायणी नदीवर एक जुना पूल आहे. या पुलावर अनेक पर्यटक उपस्थित होते. सुट्टीचा दिवस असल्याने या ठिकाणी मोठी गर्दी होती. त्यातच हा पूल कोसळल्याने अनेक जण वाहून गेले. यामध्ये काही लहान मुलेही असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

कुंडमळामध्ये ही दुर्घटना घडल्यानंतर या ठिकाणी एनडीआरएफचे पथक दाखल झालं असून बचाव कार्य सुरू आहे. तसेच या ठिकाणी अग्निशमन दलही पोहोचल्याची माहिती आहे. या ठिकाणी अजूनही काही पर्यंटक अडकले आहेत, त्यांना वाचवलं जात आहे. या ठिकाणी गर्दी करु नये असं आवाहन पोलिसांनी केलं आहे.

कुंडमळा हे ठिकाण पर्यटनस्थळ असून हे ठिकाण धोकादायक असल्याचं सांगितलं जातय. पावसाळ्यात, विशेषतः शनिवार आणि रविवारी या ठिकाणी पर्यंटक मोठी गर्दी करतात. या ठिकाणी नदीवर जुना पूल आहे. त्याचीही डागडूजी करण्यात आली नाही. असं असलं तरी प्रशासनाने त्यांच्या सुरक्षेसाठी कोणतीही उपाययोजना केली नसल्याचं दिसून येतंय. त्यामुळेच ही दुर्घटना घडल्याचं सांगितलं जात आहे.

पुणे परिसरात गेल्या चार दिवसांपासून मोठ्या प्रमाणात पाऊस पडला आहे. त्यामुळे इंद्रायणी नदीच्या पाण्याचा प्रवाहही मोठा आहे. असं असूनही पर्यटकांच्या सुरक्षेसाठी कोणतीही उपाययोजना करण्यात आली नाही.

## जिवंत बाहेर काढलेल्या व्यक्तिंची नावे

1. श्रीकांत गरुड
2. सुमेर कागवाडे
3. विजय येनकर
4. कृष्णा गागजी
5. आर्यन गायसमुद्रे
5. दीपक विरकर
6. सिद्धी बोत्रे
7. ओंकार पेहरे
8. चंद्रकांत चौगुले
9. सानवी भाकरे
10. वर्षा भाकरे
11. योगेश भंडारे
12. संजय घोपे
13. दिव्या घोपे
14. बादल सिद्राम
15. समर्थ सिद्राम
16. शंतनू निगडे
17. गोपाल तीवर
18. वैशाली उपाध्याय
19. वैभव उपाध्याय
20. शिल्पा भंडारे
21. यास्मिन चौधरी
22. अशोक भेगडे
23. सुनील कुमार
24. छोटू
25. अंजूम शहा
26. रोहन शिंदे
27. अमोल घुले
28. चित्रलेखा गौर
29. शामिका माने
30. ओम पिराजी बडगिरे
31. हारोजी मोहन आगलावे
32. इंदौल तावरे
33. सुरेश पडवळ
34. मोनाली सुरेश पडवळ
35. वेदांती पडवळ
36. विनीत पडवळ
37. योगेश पडवळ
38. शुभम वाळुंजकर
39. प्रथमेश पालालकर
40. अभिषेक पाटील
41. शौकत गौर
42. तेजस देवराय
43. प्रथमेश देवरे
44. सौरभ माने
45. दीपक कांबळे
46. ओंमकार गिरी
47. आकाश काकडे
48. साहिल शेटे
49. सलोनी उपाध्याय
50. लतिका गौड



## मृतांच्या कुटुंबीयांना पाच लाखांची मदत

**एनडीआरएफच्या जवानांनी हा पूल मधोमध कट केला असून क्रेनच्या सहाय्याने तो पूल उचलला जात आहे. या पुलाखाली एक मुलगा अडकला होता. त्याला बाहेर काढण्यात आलं आहे. आणखी एक व्यक्ती पुलाच्या खाली दबला असून त्यालाही बाहेर काढण्याचा प्रयत्न केला जात आहे. दरम्यान, या दुर्घटनेत मृत पावलेल्यांच्या कुटुंबीयांना पाच लाखांची मदत राज्य सरकारकडून केली जाणार आहे. तर या घटनेत जखमी झालेल्यांचा उपचाराचा खर्चही सरकारकडून केला जाणार आहे.**

## सगळ्या पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट होणार



**कुंडमाळा येथे झालेली घटना अत्यंत दुर्दैवी असल्याची प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. राज्यातील सगळ्या नदीवरच्या पुलाचं स्ट्रक्चरल ऑडीट करण्याच्याही सूचनाही त्यांनी दिल्या.**

## पूल बंद करणं गरजेचं होतं : सुप्रिया सुळे



**आता सरकारने तातडीने मदत करणे गरजेचं आहे. प्रशासनाने घटनास्थळी तातडीने जाऊन मदत करावी असे मत खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केले. याबाबत पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांशी मी चर्चा केल्याची माहिती सुळे यांनी दिली आहे. प्रशासन पूर्ण सक्रिय झाल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्याचे सुप्रिया सुळे म्हणाल्या. पूल जर धोकादायक असेल तर तो बंद करणं गरजेचं होतं असेही सुळे म्हणाल्या. पण आत्ता तातडीने पूर्ण ताकतीने मदत करणे आवश्यक असल्याची माहिती सुप्रिया सुळे यांनी दिली.**

# भीमा नदीवरील पूल धोकादायक

## पुलाला मोठे भगदाड असतानाही पर्यटकांची होते गर्दी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील मावळ तालुक्यात रविवारी धक्कादायक घटना घडली. तळेगाव दाभाडे शहराजवळील प्रसिद्ध पर्यटनस्थळ कुंडमळा येथे इंद्रायणी नदीवर असलेला जूना पूल कोसळला आहे. त्यामध्ये चार जणांचा मृत्यू झाला. तसेच सहा जण गंभीर जखमी झाले आहेत. पूल पडल्यानंतर वाहून गेलेल्या अनेकांना वाचवण्यात यश आले आहे. कुंडमळाप्रमाणे पुण्याच्या खेड तालुक्यातील चास कमान धरणाच्या भिंतीला समांतर असणाऱ्या भीमा नदीवरील पूल धोकादायक झाला आहे. या पुलाला मोठे भगदाड पडले आहे. यामुळे पूल पडून मोठी दुर्घटना होण्याचा धोका आहे. धरणातून पाणी सुटल्यानंतर या ठिकाणी



मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची गर्दी होत असते. भीमा नदीवर सुमारे अठरा वर्षांपूर्वी पूल बांधण्यात आला होता. या पुलाच्या कामाच्या दर्जाबाबत नेहमीच प्रश्न उपस्थित केला जात असतो. या पुलास गेल्या काही वर्षांत अनेक ठिकाणी भगदाड पडले आहे. त्याची अनेक वेळा डागडुजी करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यानंतर पूल कमकुवत आहे. या पुलावरील रेलिंगही अनेक ठिकाणी तुटले आहेत. चास कमान धरणाचे पाणी सुटल्यानंतर मोठ्या संख्येने पर्यटक वर्षाविहार करण्यासाठी या ठिकाणी येत असतात. त्यामुळे या पर्यटकांनाही मोठा धोका होण्याचा शक्यता आहे.

भीमा नदीवरील हा पूल धोकादायक बनला असतानाही त्या ठिकाणी वाहतूक सुरु आहे. ज्या ठिकाणी भगदाड पडले आहे, त्या ठिकाणी स्थानिक लोकांनी दगड आणि झाडांच्या फांद्या ठेऊन वाहन चालकांना सावध राहण्याचा इशारा दिला आहे. या पूर्वीही पुलावर विविध ठिकाणी भगदाड पडल्याने पुलावरून होणाऱ्या वाहतुकीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मात्र, धरण प्रशासन याबाबत डोळ्यावर पट्टी बांधून आहे. यामुळे मोठ्या दुर्घटनेची वाट प्रशासन पाहत तर नाही ना? असाही प्रश्न या भागातील नागरिक उपस्थित करत आहे.

# आ. सुनिल शेळके काय म्हणाले?



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

या घटनेनंतर आमदार सुनिल शेळके यांनी 'दै. आरंभ पर्व'शी बोलताना सांगितले की, "या दुर्घटनेत आतापर्यंत 6 जणांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. घटनास्थळी एनडीआरएफचे जवान पोहोचले आहेत. जमेल त्या पद्धतीने मदतकार्य केले जात आहे. घटनास्थळी रुग्णवाहिका जाऊन पोहोचल्या आहेत. नदीत वाहून गेलेल्यांना बाहेर काढण्याचे काम चालू आहे.' समोर आलेल्या माहितीनुसार या भागात पर्यटकांनी गर्दी केली होती. नदी ओलांडताना अनेक पर्यटक जीर्ण झालेल्या या पुलावर वाहने घेऊन चढले होते. त्यामुळे पुलावरील वजन वाढले आणि हा पूल कोसळला. यात अनेक लोक वाहून गेले आहेत आणि 6 जणांचा मृत्यू झाला असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र 20-25 लोक वाहून गेल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे.

# आता तरी पर्यायी मार्गाचा विचार व्हावा!



उपनगरी गाडीतून प्रवासी पडून मरण पावल्याचे व कायमचे जायबंदी झाल्याची घटना प्रथमच घडलेली नाही. कल्याण-डोंबिवली, दिवा, कळवा, मुंब्रा, ठाणे या पट्ट्यात आजवर हजार प्रवासी गाड्यांतून पडून मृत्युमुखी व जायबंदी झाले आहेत. मात्र एकाच दिवशी एकाच वेळी इतके प्रवासी पडल्याची घटना निराळीच होती. त्यावरून तर्कवितर्क सुरू होऊन सर्वच जणांनी रेल्वे प्रशासनाला लाखोली वाहिली. इतकेच काय या घटनेला संपूर्ण रेल्वेच जबाबदार आहे असे मानून रेल्वेचा उद्धार केला.

मुळात रेल्वेचे प्रश्न हे आजचे नाही. रेल्वे सुरू झाली तेव्हा मानवी लोकसंख्या तेव्हाची लोकसंख्या व आताची लोकसंख्या यात खूप फरक पडला आहे. रेल्वेने पुरेपूर बदलण्याचा प्रयत्नही केला. मात्र वाढत्या लोकसंख्या व मोठ्या प्रमाणात शहरीकरणांपुढे त्या तोकड्या पडल्या.

मुंबई शहराचा व महानगर प्रदेशाचा एकात्मिक विकास करण्याकडे आजवर सर्वांनीच दुर्लक्ष केले. एककेंद्री विकास झाल्याने दुसऱ्या ठिकाणावरून व जिल्ह्यातून हजारोंच्या संख्येने लोक शहराकडे एकाचवेळी लोंढ्यासारखे जाऊ लागले आणि रेल्वेशिवाय दुसरा कोणताच पर्याय नसल्याने रेल्वेवर पूर्णपणे भार आला. वास्तविक पाहता या रेल्वे अपघाताबद्दल इतर सर्व गोष्टींचा पर्याय आठवडाभर सुरूच होता. मात्र मूळ गोष्टीकडे अजून दुर्लक्षच होत आहे. हो, आपण हे मान्य केले पाहिजे की रेल्वेची आता क्षमता संपली आहे. मात्र आपण अजूनही रेल्वेला मुबलक पर्याय देऊ शकलो नाही हेही खरेच आहे.

अपघात झाल्यानंतर सर्व दृष्टीने त्यावर भविष्यात काय करता येईल यावरदेखील विचार झाला. मात्र आजवर मूळ समस्या राहिलेली म्हणजे ठाणे व कल्याण या रेल्वे मार्गाला नसलेला समांतर रस्ते मार्ग. हाच एक इलाज ठरू शकतो.

उपनगरी रेल्वे बंद पडली किंवा त्यावर परिणाम झाला, तर किमान रस्ता मार्ग हा पर्याय मार्ग ठरू शकतो. आज उपनगरी मार्गाला मुंबईहून ठाण्यापर्यंत पूर्व-पश्चिम बाजूस समांतर रस्ते आहेत. तीच गोष्ट पश्चिम रेल्वेवर पूर्व व पश्चिम बाजूस



निदान चर्चगेट ते बोरिवलीपर्यंत तरी समान रस्ते आहेत. मात्र ठाणे व बोरिवलीच्या पुढे समांतर रस्ता नाही. ठाण्याच्या पुढे जर कल्याण दिशेने जायचे असल्यास मुंबई नाशिक महामार्ग कल्याण, भिवंडी मार्गाने कल्याण, डोंबिवलीकडे जावे लागते तर व दिव्याकडे जाण्यासाठी अजूनही तशी व्यवस्था नाही. तर कल्याण व डोंबिवलीकडे जाण्यासाठी दुसरा मार्ग म्हणजे ठाणे व शिळफाटा मार्ग.

मात्र या रस्त्यावरून जाणे म्हणजे मोठे दिव्यच असते. मोठमोठ्या अवजड वाहतुकीमुळे अगोदरच ठाणे जिल्ह्याला ग्रासले आहे. त्यात शीळ फाट्यावरून जाणे म्हणजे एक मोठे दिव्यच असते. त्यावरून रोज प्रवास करणे हे हल्लीच्या काही उदाहरणांवरून तापदायक नसून जीव घेणेही ठरले आहे. तीच गत पुढे कल्याणहून टिटवाळा मार्गे कसाऱ्याला समांतर मार्ग हा कसाऱ्यापर्यंत तरी आहे. मात्र हि दूरवरची मार्गिका आहे, तर कल्याण-कर्जतला जाण्यासाठी तसा थेट व सोयीचा मार्ग नाही म्हणून एकदा रेल्वे बंद पडली की चाकरमान्यांना जागच्या जागी थांबण्याशिवाय अथवा घरी परतण्याशिवाय कोणताही पर्याय राहत नाही.

आजपर्यंत रेल्वे मार्गाला समांतर असा ठाणे, मुंब्रा, दिवा, डोंबिवली, कल्याण असा समांतर मार्ग होण्याची बऱ्याचवेळा घोषणा झाली. मात्र प्रत्यक्षात उतरू शकली नाही. या ठिकाणी बराचसा भाग हा कांदळवन व खाडीचा भाग येतो. त्यासाठी वेगवेगळ्या परवानग्या लागतात. मात्र जिथे मुंबईत समुद्रात मार्ग झाले, मुंबईहून नवी मुंबईला जाणारा अटल सेतू झाला, छत्रपती संभाजी महाराज किनारा मार्ग झाला, मुक्त मार्ग झाला तिथे हा रस्ता होण्यास अशी कोणती अडचण होती? याच खाडीपट्ट्यात व ठाणे जिल्ह्यात हजारो संख्येने अनधिकृत बांधकामे झाली हेही नुकताच न्यायालयाने दिलेल्या आदेशात स्पष्ट झाले आहे मात्र तिथे रस्ता बांधण्यास कोणती अडचण येत होती? आजपर्यंत कोणाला हा रस्ता महत्त्वाचा वाटू नये याचे आश्चर्य वाटते. बरं यातील दुसरी बाजू अशी की रस्ते वाहतूक तरी सुरक्षित आहे का? आज मुंबई नाशिक महामार्गाची अवस्था आपण सारे बघतोच आहोत, तोच ठाण्याहून अंजुर फाटा, कल्याण, भिवंडी फाटा इथपर्यंत पोहोचण्यासाठीच बरेच तास लागतात. तोच वाशीहून शिळफाटा मार्गे जायचे असल्यास प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो.

मुंबई नाशिक महामार्गाचे कामे अजूनही संपता संपत नाही. कसारा घाटही आता वाहतुकीसाठी धोकादायक बनला आहे.

भिवंडी परिसरातील गोदामातील मोठमोठ्या कंटेनरची वाहतूक रोज हजारोंच्या संख्येने वाशी तुर्भेहून जेएनपीटीकडे जात असते. त्यांना याच रस्त्यांचा वापर करावा लागतो. त्यामुळे स्थानिक शहरांच्या वाहतुकीला मर्यादा येतात. आज ठाणे, भिवंडी, रबाळे, तळोजा, वाशी, बेलापूर आर्थिक केंद्र झाल्यामुळे सतत वाहतूक कोंडीचा फटका येथील स्थानिक जनतेस रोज बसत असतो. एरवी कुठल्या अपघाताचे कारण असते, तर पावसाळ्यात मोठ्या खड्ड्यांचे कारण त्यामुळे वाहतूक कोंडी बरोबरच अपघातांचे प्रमाणही प्रचंड प्रमाणात या पट्ट्यात वाढले आहे. राहता राहिला प्रश्न येथील बस सेवांचा मुंबई शहरात रेल्वे लोकल बरोबरच बेस्ट बस सेवेचा एक पर्याय सक्षम पर्याय आहे. मात्र एकदा ठाण्याच्या बाहेर पडलो की तशी कोणती सोय नाही. त्या-त्या पालिकेच्या परिवहन सेवा आहेत.



# “द. आफ्रिकेचा लॉर्डसवर टेंभा

**डॉ. अनिल पावशेकर**

● मो. ९८२२९३९२८७ ●
● anilpawshekar159@gmail.com ●

**(दै. आरंभ पर्व)**

प्रचंड उत्सुकता लागलेल्या कसोटी क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेत द.आफ्रिका संघाने बलाढ्य ऑसी संघाला खडे चारत पहिल्यांदाच विजेतेपद पटकावले आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत एडन मार्करम आणि टेंबा बवुमाने कांगारूंचा प्रतिकार करत लॉर्डसवर विजयाचा टेंभा मिरवला आहे. आयसीसी स्पर्धेत सातत्याने चांगली कामगिरी करणाऱ्या द.आफ्रिकेला यश वारंवार हुलकावणी देत होते. मात्र यावेळी त्यांचे नशीब फळफळले आणि तब्बल २७ वर्षानंतर त्यांचा आयसीसी चषकाचा दुष्काळ संपुष्टात आला आहे.

झाले काय तर द. आफ्रिका, वेस्ट इंडीज आणि न्यूझीलंड हे तीन संघ कायम अस्सल क्रिकेट रसिकांच्या गुड बुक्स मध्ये आहेत. यापैकी वेस्ट इंडीज आणि किवी संघाने आयसीसी चषकाला गवसणी घातली आहे परंतु प्रोटीयाज संघ नेहमीच मोक्याच्या वेळी गळपटत होता आणि हातातोंडाशी आलेला विजय गमावत होता. यामुळेच की काय त्यांना चोकर्स चा टॅग लागला होता. मात्र यावेळी परिस्थिती बदलली होती, टेंबा बवुमाच्या नेतृत्वात या संघाने इतिहास रचत चोकर्सचा डाग पुसून काढला आहे. चौथ्या डावात यशस्वी पाठलाग करताना त्यांनी स्टार्क, हेझलवूड आणि पॅट कमीन्सला भीक न घालता पक्का निर्धार करत अजिंक्यपद प्राप्त केले आहे. दोन्ही संघांचा विचार केला तर निश्चितच कांगारूंचे पारडे जड होते, त्यातही अंतिम सामना म्हटला की कांगारूंचे बळ दुप्पट होते. फायनलला त्यांचे किलर इंस्टिक्ट कमाल पातळीवर असते. त्याविरूद्ध द.आफ्रिकेचा संघ एकदम सज्जन आणि सोज्वळ. तरीपण शेवटी क्रिकेट म्हटले की “बस समझ लिए” असे नसते आणि हेच या सामन्यात घडले. पहिल्याच दिवशी ऑसी संघ दोनशेत गुंडाळून आफ्रिकन संघाने चढाई जिंकली होती. पण कांगारूंनी जबरदस्त प्रतिहल्ला करत आफ्रिकेला १३८ धावांत गारद केले. तर ऑसींच्या दुसऱ्या डावात पुन्हा एकदा रबाडा अँड कंपनीने ऑसींचा कबाडा करत त्यांना २०७ धावांवर रोखले. पहिल्यावहिल्या कसोटी जेतेपदासाठी आफ्रिका संघाला चौथ्या डावात चांगली कामगिरी करणे गरजेचे होते आणि त्यांच्याकडे मार्करम हा हुकमाचा एक्का होता परंतु पहिल्या डावात त्याने भोपळा न फोडल्याने चिंता वाढली होती. मात्र मार्करमने संघाचा विश्वास सार्थ ठरवला. त्याने मुल्डर, बवुमा, स्टब्स आणि बेडींघम सोबत अनुक्रमे ६१, १४७, २४ आणि ३५ धावांच्या चार महत्त्वपूर्ण भागीदारी रचल्या आणि आपल्या संघाला आयसीसी चषक मिळवून दिला. या कसोटीत दोन्ही संघांशिवाय खरी गंमत आणली तर ती लॉर्डस च्या खेळपट्टीने.

पहिल्या दोन दिवसात खेळपट्टी जणुकाही सळसळती नागीण होती. तिच्या वेग आणि बाऊंसने भलेभले फलंदाज गांगरून गेले. पहिल्या आणि दुसऱ्या दिवशी प्रत्येकी १४/१४ फलंदाजांना फस्त करत खेळपट्टीने आपले जहाल रूप दाखवले होते. मात्र या रणात पहिल्या डावात ऑसींच्या स्टीव्ह स्मिथ, वेबस्टर यांनी किल्ला लढवला तर आफ्रिकेच्या टेंबा बवुमा आणि बेडींघमला थोडाफार प्रतिकार करता आला. पहिल्या डावात ऑसींना ७४ धावांची बहुमूल्य आघाडी मिळाली होती. मात्र त्यांचा दुसरा डाव पुन्हा एकदा दोनशेत संपल्याने त्यांना मोठी आघाडी घेता आली नाही. ऑसींचे दुर्दैव म्हणा की आफ्रिकेचे सुदैव म्हणा, तिसऱ्या दिवशी खेळपट्टी वाल्याची वाल्मिकी झाली होती. तिसऱ्या दिवशी पहिल्या आणि दुसऱ्या सत्रात प्रत्येकी दोन विकेट्स गेल्या. तिसऱ्या सत्रात तर मार्करम बवुमा जोडीने आरामात फलंदाजी करत सामना पुर्णपणे आफ्रिकेकडे वळविला होता. चौथ्या दिवशीचा खेळ म्हणजे खरेतर आफ्रिकेच्या विजयाची औपचारिकता होती परंतु कांगारू सहजासहजी सामना सोडणार नव्हते. तरीपण खेळपट्टी आपल्या शांत सौम्य रूपात कायम असल्याने कांगारूंची दाळ शिजली नाही. ऑस्ट्रेलिया संघाने कधी नव्हे ते गचाळ क्षेत्ररक्षण करत सामन्यात पुनरागमनाची संधी दवडली. मार्करमला २३ धावांवर तर बवुमाला ३ आणि ४३ धावांवर जीवदान देत कांगारूंनी आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला. स्टीव्ह स्मिथ, वेबस्टर आणि अॅलेक्स कॅरी वगळता इतर फलंदाजांचा विशेषतः ट्रॅव्हिस हेडचा फ्लॉप शो कांगारूंच्या मुळावर आला. तर गोलंदाजीत कमीन्सने पहिल्या डावात सहा बळी जरूर घेतले पण दुसऱ्या डावात तो आणि त्याचे सहकारी बेअसर ठरले. आफ्रिकेच्या रबाडाने दोन्ही डावात धारदार गोलंदाजी करत तब्बल ९ बळी टिपले. त्याला जान्सेन आणि एनगीडीने उत्तम साथ दिली.

तर फलंदाजीत पहिल्या डावात पिछाडीवर असतानाही मार्करम बवुमा जोडीने दमदार फलंदाजी करत सामना जिंकून दिला. aटी ट्वेंटी विश्वचषक, चॅम्पियन ट्रॉफी पाठोपाठ कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत कांगारूंचे गर्वहरण झाले असून द. आफ्रिका नवा विजेता म्हणून उदयास आला आहे. १९९८ ला बांगलादेशात झालेल्या चॅम्पियन ट्रॉफीच्या विजयानंतर या संघाला आयसीसी चषकासाठी जीवघेणी प्रतीक्षा करावी लागली. मग तो स्मिथ असो की एबीडी अथवा शॉन पोलॉक, डेल स्टेन असो द. आफ्रिका संघाची जेतेपदाला हुलकावनी म्हणजे पप्पू कान्ट डान्स साला होती. मात्र छोटी हाईट बिग फाईट असलेल्या टेंबा बवुमाने आपल्या नेत्रुत्वात आफ्रिका संघाला हिमालयाची उंची गाठून दिली आहे. “छोटे तीर घाव गंभीर” सारखे त्याने तुलनेत कमी अनुभवी संघाला जगज्जेता बनवले आहे. थोडक्यात काय तर टेंबा बवुमाने आपल्या लिलयेने आफ्रिका संघाला “पंगुं लंघयते गिरिम” करून दाखवले आहे.

# थोडक्यात




## मोकरवात श्री. हनुमानाची प्रतिष्ठापना

वारजे (आरंभ पर्व) : अहिरे गाव मोकरवाडी येथे पद्मावती माता मंदिर शेजारी तालीम मध्ये हनुमानाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. यावेळी सकाळी मूर्तीची पूजा होम हवन भव्य अशी बैलगाडी मिरवणूक व वाजवत गाजवत भजन करत मूर्तीची मिरवणूक अतिशय उत्साहात पार पडली. या कार्यक्रमासाठी नितीन भाऊ, वांजळे नितीन वांजळे बाळकृष्ण वांजळे राजू वांजळे विठ्ठल वांजळे ,अजय वांजळे प्रसाद मोकर ,नंदू मोकर, पांडुरंग वांजळे ,भाग्येश मोकर मंगेश मोकरआदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता महाप्रसादांनी करण्यात आली होती कार्यक्रमाला महिला व ग्रामस्थ व संख्येने उपस्थित होते. अत्यंत उत्साहात कार्यक्रम संपन्न झाल्याची भावना ग्रामपंचायत सदस्य नवनाथ मोकर यांनी व्यक्त केली.

## गणपतराव देशमुखांच्या नातवाच्या साध्या पद्धतीच्या लग्नाची चर्चा

सोलापूर (आरंभ पर्व) : शेकापचे ज्येष्ठ नेते (कै.) गणपतराव देशमुख यांनी आयुष्यभर साधेपणा जपला.याच आदर्श शिकवणीतून नातू डॉ. अनिकेत चंद्रकांत देशमुख यांनी श्रीमंतीचे प्रदर्शन न करता, थाटमाट, डामडौल बाजूला ठेवून साध्या पद्धतीने विवाह केला आहे.

## सायकल प्युअर अगरबत्तीकडून पुण्यात नाविन्यपूर्ण सुगंधी धूप सादर



पुणे (आरंभ पर्व) : सायकल प्युअर अगरबत्ती ही भारतातील आघाडीची उदबत्ती उत्पादक कंपनी म्हणून उभी असून ती ७७ वर्षांचा लक्षणीय प्रवास साजरा करत आहे. एका छोट्या खोलीतून सुरुवात करून या कंपनीने करत ७५ हून अधिक देशांमध्ये आपल्या सुगंधाचा प्रभाव वाढवला आहे, त्यातून तिने जागतिक प्रवासाला सुरुवात केली आहे. जगातील सर्वात मोठ्या अगरबत्ती उत्पादकांपैकी एक असलेल्या सायकल प्युअर अगरबत्तीने पुण्याच्या बाजारपेठेत 'थ्री इन वन वायटी इन्सेन्स स्टिक्स' आणि 'प्रेरणा बांबूलेस इन्सेन्स स्टिक्स' ही दोन नाविन्यपूर्ण उत्पादने सादर केली आहेत. गुणवत्ता, प्रामाणिकपणा आणि विविधता यांच्या शोधात असलेल्या आधुनिक ग्राहकांचा आध्यात्मिक आणि सुगंधी अनुभव समृद्ध करण्यासाठी ही नाविन्यपूर्ण उत्पादने तयार करण्यात आली आहेत. भक्ती, शुद्धता आणि नाविन्यपूर्णतेचे प्रतीक असलेली 'प्रेरणा' ही बांबूविरहित (बांबूलेस) सॉलिड अगरबत्ती आहे. सायकलच्या आयकॉनिक थ्री-इन-वन अगरबत्ती पॅकने ती प्रेरित आहे. आरोग्य, संपत्ती आणि आनंद यासाठीच्या सार्वत्रिक प्रार्थनांना समर्पित असलेल्या तीन दिव्य सुगंधांसहित 'प्रेरणा' येत आहे. तिच्या पातळ, अगरबत्तीएवढ्या लांबीच्या ठोस धूप स्वरूपामुळे भावपूर्ण संवेदनशील अनुभव मिळतो. तिची किंमत केवळ १० रुपये असून पर्यावरणपूरक, बांबूविरहित धूप पर्यायांची वाढती मागणी ती पूर्ण करते. त्याच सोबत ती आपली अतुलनीय सुगंध गुणवत्ता टिकवून ठेवते. 'थ्री-इन-वन वायटी' अगरबत्ती ही बारीक दळलेल्या, स्थानिक पातळीवर मिळविलेल्या लाकडाच्या भुग्यापासून (पावडर) तयार केली जाते. त्यामुळे सुंगधी दरवळ आणि प्रसार वाढतो. दीर्घकाळ टिकणारा सुगंध आणि उत्तम सुगंध प्रसारण हवे असलेल्यांसाठी हिची रचना करण्यात आली आहे.






## थोडक्यात



### चंद्रकांत दादा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त फळे वाटप

धायरी (आरंभ पर्व) : महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण संसदीय कामकाजमंत्री आदरणीय श्री. चंद्रकांत दादा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त दळवेवाडी येथील अन्न वृद्धाश्रम येथे फळे वाटप करण्यात आले. चंद्रकांत दादा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित फळे वाटप कार्यक्रम वडगाव बुद्रुक धायरी मंडल यांच्या वतीने आयोजित करण्यात आला. यावेळी चंद्रकांतदादा पाटील यांना मान्यवरांनी मनोगतातून अभिष्टचिंतन पर शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी खडकवासला भाजपा अध्यक्ष सचिन मोरे, मंडलाध्यक्ष यशवंत लायगुडे, माजी नगरसेवक हरिदास चरवड, युवा मोर्चाचे श्री सारंग नवले, अनिल मते, दत्तात्रय देशपांडे यांच्यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




### मराठा समाजाने आचारसंहितेची अंमलबजावणी करावी

लोणी काळभोर (आरंभ पर्व) : मराठा समाजातील नागरिकांना जागृत करण्यासाठी पुणे - सोलापूर महामार्गावरील सोजश पँलेस येथे सकल मराठा समाज, हडपसर, हवेली तालुक्यातील नागरिकांची महत्वपूर्ण बैठक आयोजीत करण्यात आली होती .पुणे शहर, पिंपरी -चिंचवड, सोलापूर जिल्हा व पुणे जिल्ह्यातुन मोठ्या प्रमाणावर मराठा बांधव उपस्थित होते. यावेळी मराठा समाजाने आचारसंहितेची अंमलबजावणी करावी अशी मागणी मराठा समाजाच्या बांधवांनी केली आचारसंहितेच्या दोन बाजू ठरवून एक कमिटी नेमून त्या कमिटीद्वारे काम करावे लग्न जरी मोठ्या थाटामाटात केले तरी समाजाची बांधिलकी म्हणून काही निधी मराठा समाजास द्यावा त्यातून त्या निधीचा वापर मराठा समाजातील गोरगरीब मुला मुलींच्या लग्नासाठी होऊ शकतो .मुळशी तालुक्यातील वैष्णवी हगवणे यांनी हुंड्यासाठी सासरच्या छळाला कंटाळून आत्महत्या केल्यानंतर संबंध महाराष्ट्रातुन हगवणे कुटुंबा विषयी चिड निर्माण झाली .त्याविषयी ठिकठिकाणी आंदोलने झाली .बैठका घेतल्या गेल्या . त्यामुळे मराठा समाज विवाह आचारसहिता तयार करून ती आज वाचून दाखवण्यात आली. यावेळी अनेक मराठा नागरिकांनी आपले मनोगत व्यक्त केले .यावेळी राजेंद्र कोंढरे, गुलाब गायकवाड, राजेंद्र कुंजीर, उत्तम कामठे, रोहिदास उंद्रे, कमलेश काळभोर, सूर्यकांत काळभोर, रमेश उंद्रे, संतोष भोसले, गजानन जगताप, अनिरुद्ध मराठे , भाऊ जाधव, राजेश काळभोर, काळूराम चौधरी, महादेव कुंजीर, भाऊसाहेब महाडिक, सचिन सुंबे, सुनील तुपे, अमोल भोसले, बापू चौधरी, अनिल ताडगे, सचिन आडेकर आदी उपस्थित होते या कार्यक्रमात महिलांनी मोठ्या प्रमाणावर हजेरी लावली. यावेळी हुंडाविषयीची कविता विद्यार्थ्यीनी शिवांजली कामठे हीने म्हणून दाखवली .यावेळी मराठा समाजाने विवाह विषयी केलेली आचारसंहिता वाचून दाखवण्यात आली. समाजात हुंडाबळी जाऊ नये म्हणून विविध २२मुद्दे या आचारसंहितेत घेतले आहेत .यामध्ये लग्नकार्याचे सर्व कार्यक्रम एकाच दिवशी घेण्यात यावे , बुफे पद्धत बंद करावी त्यामुळे अन्न वाया जाण्याचे प्रमाण थांबेल, स्टेजवर पुढाऱ्यांची गर्दी कमी करावी. लग्न वेळेवर लावून सर्वांची वेळेची बचत करावी. जर पुढारी लोकांनी ठरवले की वेळेच्या नंतर लग्न लागण्यास उशीर झाला तर आम्ही थांबणार नाही तो पुढाऱ्यांचा मोठेपणा ठरेल असे गुलाब गायकवाड यांनी सांगितले. प्री वेडींग अजिबात करू नये कारण त्यामुळे प्री-वेडिंगच्या नावाखाली बाहेर गावी जाऊन अनेक चाळे होत असल्यामुळे लग्न मोडण्याचे प्रमाण वाढले आहेत . लग्नाचा खर्च मुलांच्या शिक्षणासाठी किंवा त्यांच्या व्यवसायाच्या भांडवलासाठी करावा . नवरा नवरीला आशीर्वाद देण्यासाठी समाजातील एका ज्येष्ठ व्यक्तीला सांगावे .ज्या कुटुंबाची पार्श्वभूमी सुनेचा हुंडा किंवा काही कारणास्तव छळ होत असेल तर अशा कुटुंबाशी संबंध होणार नाही याची काळजी घ्यावी. सासरी होणाऱ्या अन्यायाबद्दल मुलीच्या पुढील जीवन सुसह्य होण्यासाठी माहेरच्या लोकांनी पुढाकार घ्यावा.

# शेतकऱ्यांच्या हितासाठी शेतकरीच पुढे!

## सारोळ्यातील कुऱ्हाडे पिता-पुत्रांची बियाणे उत्पादनात यशस्वी घोडदौड





### कांद्यासह विविध पिकांच्या बियाण्यांचे दर्जेदार उत्पादन – ८ वर्षांची यशोगाथा

### कुऱ्हाडे यांच्या शेतकरी बियाण्यास शेतकऱ्यांचा मिळत आहे चांगला प्रतिसाद

**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

महागाईने कधी नव्हे इतके टोक गाठले असले तरी शेतकऱ्यांची मेहनत आणि जिद्द मात्र अद्यापही अबाधित आहे. बार्शी तालुक्यातील सारोळे येथील भारत कुऱ्हाडे आणि त्यांचे पुत्र शरद कुऱ्हाडे हे गेली आठ वर्षे शेतकऱ्यांसाठी शेतकरी बियाणे तयार करत आहेत. त्यांनी उत्पादित केलेली बियाणे दर्जेदार असून उगमशक्ती देखील उत्तम असल्यामुळे परिसरातील अनेक शेतकऱ्यांचा विश्वास त्यांनी मिळवला आहे.

शेती हा अनिश्चिततेचा व्यवसाय असला तरी कुऱ्हाडे पिता-पुत्रांनी या व्यवसायातही शाश्वततेचा मार्ग शोधला. फक्त स्वतःपुरती मर्यादा न ठेवता, त्यांनी इतर शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेत बियाणे उत्पादनाचा व्यवसाय सुरु केला. आज त्यांच्या बियाण्यांची मागणी संपूर्ण महाराष्ट्रात वाढत आहे.

श्री. भारत कुऱ्हाडे हे सारोळे येथील एक प्रगतशील शेतकरी आहेत. त्यांच्या शेतातील विविध प्रकल्प, फळबागा आणि आधुनिक शेतीतून त्यांनी भरघोस उत्पन्न मिळवले आहे. सुरुवातीला मर्यादित प्रमाणात बियाणे तयार करून विक्रीस सुरुवात केली. पण शेतकऱ्यांकडून मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे आज त्यांनी मोठ्या प्रमाणात बियाणे उत्पादन सुरू केले आहे. त्यांनी उत्पादित केलेली कांदा बियाण्याची विविध जातं – पंचगंगा, एलोरा, पूना, फुरसुंगी यांना चांगली मागणी आहे. याशिवाय ऊसाचे रोपे, केळी, पपई यासह बागायती पिकांचे बियाणेदेखील त्यांनी सेंद्रिय पद्धतीने तयार केले आहे.

"फक्त नफा कमावणे नव्हे, तर शेतकऱ्यांच्या हितासाठी काम करणे हा आमचा हेतू आहे," असे भारत कुऱ्हाडे सांगतात. अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत असल्यामुळे कुऱ्हाडे कुटुंबीय बियाणे कधी रोख, तर कधी उधारीवरही देतात.

शरद कुऱ्हाडे यांनी वडिलांच्या खांद्याला खांदा लावत हा व्यवसाय अधिक विस्तारला आहे. आधुनिक व्यवस्थापन, नियोजनबद्ध शेती आणि प्रयोगशील दृष्टिकोनातून त्यांनी शेतीत नवचैतन्य आणले आहे.

सारोळे येथील त्यांच्या चार एकर शेतीतून त्यांनी विविध बियाण्यांचे उत्पादन घेतले असून, एका हंगामात एक टन उत्पन्न व अंदाजे १५ लाख रुपयांची उलाढाल साध्य केली आहे. हे त्यांच्या प्रगतीशील शेतीचे द्योतक आहे.

कुऱ्हाडे कुटुंबीयांचे बियाणे सध्या संपूर्ण महाराष्ट्रभर वितरित होत आहे. परिसरातील अनेक शेतकरी आज त्यांच्या यशाचा भाग बनले आहेत. त्यांनी उगमक्षमतेची उत्तम बियाणे कमी दरात उपलब्ध करून दिल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधान दिसून येते.

> **● संपर्कासाठी ●**
> **शेतकरी बियाणे मिळवण्यासाठी संपर्क करा**
> **- 9850123171**
> **- 9881690911**

> **"मी केवळ नफा कमवण्यासाठी नव्हे, तर शेतकऱ्यांसाठी काहीतरी करण्याच्या भावनेतून हे कार्य करत आहे."**
> **- भारत कुऱ्हाडे बियाणे उत्पादक, सारोळे, ता. बार्शी**
> **"शेतीत अभ्यास आणि प्रयोग यामुळे यश नक्की मिळते. वडिलांचा आदर्श समोर ठेवून मीही शेतीत स्वतःला झोकून दिले आहे."**
> **- शरद कुऱ्हाडे, प्रगतशील शेतकरी**

> **"मी गेली अनेक वर्षे भारत कुऱ्हाडे यांचे बियाणे वापरत आहे. उत्तम दर्जा, चांगली उगमशक्ती आणि परवडणारी किंमत यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने हे बियाणे जरूर वापरावे."**
> **– बाळासाहेब निचळ, शेतकरी, राळेरास (ता. बार्शी)**
> **"भारत व शरद कुऱ्हाडे यांची मेहनत आणि निष्ठा त्यांच्या बियाण्यांतून स्पष्ट जाणवते. चांगले उत्पादन हवे असल्यास त्यांच्या बियाण्यांचा वापर जरूर करा."**
> **– विजय जाधव, शेतकरी, सारोळे**

**'शेतकरी बियाणे' – शेतकऱ्यांच्या सेवेसाठी शेतकऱ्यांकडून! (सेंद्रिय, विश्वासार्ह आणि परवडणारे बियाणे – महाराष्ट्रभर वितरित)**



### विविध समस्या सोडवण्यासाठी रूपेश घुले पाटील यांचे निवेदन

**● आ. भीमराव तापकीर यांच्या नेतृत्वाखाली सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयात बैठक**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नांदेड व जेपी नगर परिसरातील प्रलंबित विकासकामांबाबत नागरिकांकडून होणाऱ्या तक्रारींची दखल घेत, भाजप मंडलाध्यक्ष रूपेश घुले पाटील यांनी पुणे महानगरपालिकेला निवेदन दिले आहे. खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव तापकीर यांच्या नेतृत्वाखाली, सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयात सहाय्यक आयुक्त प्रज्ञा पोतदार यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली.

विशेषतः, धायरी फाटा – नांदेड फाटा – खडकवासला मुठा कालव्यावरील रस्ता विकसित केल्यास सिंहगड रोडवरील वाहतूक कोंडी कमी होईल, असे त्यांनी अधोरेखित केले.

> **सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयात प्रभावी चर्चा**
> **या बैठकीत सहाय्यक आयुक्त प्रज्ञा पोतदार यांनी आ. तापकीर यांच्या मार्गदर्शनात मांडण्यात आलेल्या सर्व मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देत लवकरात लवकर कार्यवाही होईल असे आश्वासन दिले.**

### देशी झाडांची लागवड व्हावी- प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"माणसाने सिमेंटचे जंगल उभारताना नैसर्गिक संपत्तीवर आघात केला. त्यामुळे निसर्गाचा, पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला आहे. जागतिक तापमान वाढ, प्रदूषणाची समस्या जगभर सतावत आहे. अशावेळी पर्यावरणाचा समतोल राखणाऱ्या सुवर्णपिंपळ, वड, आंबा, चिंच, बांबू यांसारख्या देशी झाडांची लागवड मोठ्या प्रमाणात व्हायला हवी," असे प्रतिपादन राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी केले. पर्यावरण संवर्धनाला प्रोत्साहन देणाऱ्या 'जागर पर्यावरणाचा'सारख्या कार्यक्रमाची आज गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.



पद्मा प्रतिष्ठान व ज्ञानमाऊली फाऊंडेशन आयोजित 'जागर पर्यावरणाचा' कार्यक्रमावेळी प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी बोलत होत्या. या कार्यक्रमाला राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष धीरज घाटे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रकुलगुरू डॉ. पराग काळकर, उद्योजक जवाहरशेठ चोरगे, चाटे शिक्षण संस्थेचे प्रा. फुलचंद चाटे, पद्मा प्रतिष्ठानचे संस्थापक शशिकांत कांबळे, ज्ञानमाउली फाउंडेशनच्या संस्थापिका पुष्पा रणदिवे-कांबळे, पर्यावरण तज्ज्ञ प्रभाकर कुकडोलकर, उद्योजक नितीन हणमघर, हेमंत कांबळे आदी उपस्थित होते.

पर्यावरण संरक्षणात जागतिक पातळीवर योगदान देत असलेले ट्रीमॅन ऑफ इंडिया विष्णू लांबा यांच्यासह भूमाता ब्रिगेडच्या अध्यक्षा तृप्ती देसाई, पर्यावरण अभ्यासक डॉ. सचिन पुणेकर, उद्योजक तुषार गोसावी, माजी नगरसेविका ज्योती गोसावी, राष्ट्रीय खेळाडू प्रियांका यादव व मयानी कांबळे, गायिका मनीषा निश्चल, सोनाली कांबळे यांना 'जागर पर्यावरणाचा' सन्मान देऊन गौरविण्यात आले. सिंहगड रस्त्यावरील मोंटेरोजा सोसायटी क्लब हाऊसमध्ये हा कार्यक्रम झाला. ज्ञानगंगोत्री विशेष मुलांची निवासी शाळा संस्थेला ५१ हजार रुपयांचे अर्थसहाय्य देण्यात आले.

प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, "प्रत्येकाने एक झाड लावून त्याचे संवर्धन करण्याचा निश्चय करावा. निसर्गातील प्रत्येक घटकाचे, अगदी कीटकाचेही अनन्यसाधारण स्थान आहे. एकेकाळी पुण्याचे पर्यावरण देशात आदर्श मानले जात होते. अलीकडे पर्यावरणाचा ऱ्हास मोठ्या प्रमाणात होत आहे. हे टाळण्यासाठी येथील वनराई, टेकडी जतन करण्याची जबाबदारी आपली आहे." रुपाली चाकणकर म्हणाल्या, "वाढदिवसाच्या निमित्ताने पर्यावरणाचा जागर करण्याचा उपक्रम स्तुत्य आहे. आपले आरोग्य चांगले राहायचे असेल, तर पर्यावरणाचे संवर्धन खूप गरजेचे आहे. प्रदूषणाच्या अनेक समस्या माणसाला सतावत आहेत. त्यामुळे आजूबाजूला खूप झाडे लावण्याची गरज आहे. प्रत्येकाने वृक्षारोपण यज्ञात सहभाग घेतला पाहिजे." विष्णू लांबा म्हणाले, "महाराष्ट्रामध्ये एक लाख झाडे लावण्याचा संकल्प कांबळे यांनी हाती घेतला आहे. वृक्षरोपणाच्या या मोहिमेचे राष्ट्रीय समन्वयक म्हणून त्यांची नियुक्ती केली आहे. 'जागर पर्यावरणाचा' हा कार्यक्रम या मोहिमेचा शुभारंभ आहे. केक कापून, नको तिथे पैशांची उधळपट्टी करून वाढदिवस करण्यापेक्षा हा उपक्रम अतिशय विधायक असा आहे."

धीरज घाटे यांनीही मनोगत व्यक्त केले. शशिकांत कांबळे यांनी स्वागत केले. जीवराज चोले यांनी प्रास्ताविक केले. मोनिका जोशी यांनी सूत्रसंचालन केले. पुष्पा रणदिवे-कांबळे यांनी आभार मानले.

**पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाची रणनीती ठरवणारी नियुक्ती**

# घुले पाटील, लायगुडे यांच्यावर भाजपची मोठी जबाबदारी!

**मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक)**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतीय जनता पक्षाने आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संघटन बळकट करण्यासाठी महत्त्वाच्या नियुक्त्या केल्या आहेत. खडकवासला मतदारसंघातील सिंहगड रोड, वडगाव बुद्रुक, धायरी आणि शिवणे या प्रभागांमध्ये नव्या मंडलाध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली आहे.

धायरी-शिवणे मंडलाध्यक्षपदी रूपेश घुले पाटील, तर वडगाव बुद्रुक-धायरी मंडलाध्यक्षपदी यशवंत लायगुडे (बापू) यांची निवड करण्यात आली आहे.

**रूपेश घुले पाटील – ग्रामपंचायतीतून भाजपमध्ये भरारी**

रूपेश घुले पाटील हे पूर्वी नांदेड ग्रामपंचायतीचे उपसरपंच म्हणून कार्यरत होते. प्रशासनातील अनुभवासोबतच त्यांचा सर्वपक्षीय नेत्यांशी उत्तम जनसंपर्क आहे. नांदेड व आजूबाजूच्या परिसरात ते सक्रिय राहिले असून, त्यांच्या सहकार्याच्या वृत्तीमुळे स्थानिकांत विश्वास निर्माण झाला आहे.

त्यांच्या याच गुणवत्तेची दखल घेत भाजपने त्यांच्यावर धायरी-शिवणे विभागाच्या मंडलाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली आहे. महानगरपालिका निवडणुकीच्या दृष्टीने हा भाग अत्यंत संवेदनशील असून, पक्ष संघटन बळकट करण्याच्या दिशेने त्यांच्याकडून अपेक्षा वाढल्या आहेत.

**यशवंत 'बापू' लायगुडे – संयमी युवा नेतृत्वाची निवड**

यशवंत लायगुडे उर्फ बापू हे गेल्या दहा वर्षांपासून सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय आहेत. त्यांनी यापूर्वी भाजपमध्ये प्रभाग अध्यक्षपदाची धुरा यशस्वीपणे सांभाळली आहे. मृदू, संयमी आणि लोकांशी सहज संबंध निर्माण करणारे व्यक्तिमत्त्व ही त्यांची ओळख आहे.

माजी नगरसेवक राजाभाऊ लायगुडे हे त्यांचे चुलते असून, त्यांच्या राजकीय वारशाचा फायदा यशवंत लायगुडे यांना झाला आहे. प्रशासनाचा थेट अनुभव नसतानाही, त्यांनी धायरी व परिसरातील अनेक समस्या सातत्याने उपस्थित करत, कार्यकर्त्यांमध्ये जागरूकता निर्माण केली आहे.

या दोघा मंडलाध्यक्षांवर पक्षाने आगामी निवडणुकीसाठी १६ नगरसेवक निवडून आणण्याचे मोठे उद्दिष्ट ठेवले आहे. संघटनात्मक बांधणीसह, मतदारसंघातील स्थानिक प्रश्नांची जाण आणि कार्यकर्त्यांशी असलेला थेट संवाद हे त्यांचे बलस्थान आहे.

**महायुती की स्वबळ? भाजपा स्वबळाची तयारी सुरू**

पुणे महानगरपालिका निवडणूक महायुतीच्या तत्त्वावर लढवायची की भाजप स्वबळावर उतरणार? हा प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे. मात्र, पक्षात अंतर्गत तयारी स्वबळाचीच सुरू असून, त्याचे संकेत या नवीन नियुक्त्यांमधून स्पष्ट होत आहेत.

**घुले-लायगुडे होऊ शकतात उमेदवार?**

भाजपच्या महानगरपालिका उमेदवारीसाठी रूपेश घुले व यशवंत लायगुडे यांची नावेही चर्चेत आहेत. त्यांची कार्यक्षमता, स्थानिकांमध्ये विश्वासार्हता, संघटन कौशल्य आणि जनसंपर्क लक्षात घेता, ते पक्षाचे प्रभावी चेहरे ठरू शकतात.





तापकीर, मोरे यांची मजबूत साथ

या दोन्ही मंडलाध्यक्षांना आमदार भीमराव तापकीर, तसेच खडकवासला मतदारसंघाचे अध्यक्ष सचिन मोरे यांचे भरभक्कम पाठबळ असून, भाजपच्या अंतर्गत गटांमध्ये त्यांचे चांगले संबंध आहेत. त्यामुळे संघटन आणि निवडणूक यशासाठी दोघांचीही भूमिका महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

**पक्षसंघटनेपासून उमेदवारीपर्यंत घुले पाटील आणि लायगुडे यांची वाटचाल निश्चितच लक्षवेधी ठरणार आहे.**

महानगरपालिका निवडणुकीचा रंग भरू लागला असून, भाजपने रणनीती आखायला सुरुवात केली आहे – त्याचं पहिलं पाऊल या दोघांच्या नेतृत्वातून दिसून येत आहे.

## थोडक्यात



### प्रशिक्षण शिबिर, राज्यस्तरीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर आयोजन

पिंपरी-चिंचवड (आरंभ पर्व) : मराठा सेवा संघ प्रणित मराठा उद्योजक विकास आणि मार्गदर्शन संस्था – पुणे जिल्हा यांच्या वतीने उद्योजकतेस चालना देण्यासाठी व आगामी राज्यस्तरीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर एक दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर बुधवार, ११ जून २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता द गजेबो वर्ल्ड ऑफ व्हेज, वाकड येथे संपन्न झाले. या शिबिरामध्ये विविध उद्योगक्षेत्रातील तज्ज्ञ व मार्गदर्शक आपले अनुभव, संकल्पना व व्यावसायिक धोरणे सहभागी उद्योजकांसमोर मांडण्यात आली. नवउद्योजकांना योग्य दिशा देणे व उद्योग विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे, हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. शिबिरामध्ये शिवश्री पुरुषोत्तमजी खेडेकर, संस्थापक – मराठा सेवा संघ; शिवश्री अर्जुन तनपुरे, ज्येष्ठ मार्गदर्शक; शिवश्री राजेंद्र सिंग पाटील, अध्यक्ष – राज्य मराठा उद्योजक संस्था; शिवश्री संजयजी वायाळ, आंतरराष्ट्रीय अध्यक्ष; शिवश्री गंगाधर बनवरे, प्रमुख प्रवक्ते; तसेच शिवश्री विजय घोगरे, अध्यक्ष – मराठा सेवा संघ (महाराष्ट्र राज्य), जिल्हाध्यक्ष अर्जुन खामकर आदी मान्यवर उपस्थित होते. शिवश्री विजय घोगरे यांनीही आपल्या मनोगतात नमूद केले, "या शिबिरातून नविन कल्पना, धोरणे, व नेटवर्किंग यामुळे तरुण उद्योजक घडतील आणि त्यांच्या व्यवसायवाढीस मदत होईल." या शिबिराबाबत माहिती देताना शिवश्री गंगाधर बनवरे म्हणाले, "मराठा समाज कृषिप्रधान असला तरी नव्या पिढीत उद्योगशीलता वाढावी या हेतूने हे शिबिर घेतले जात आहे. उद्योगाच्या माध्यमातून तरुणांना रोजगार मिळावा, ही आमची भूमिका आहे."




### अपयशाने खचून न जाता चुका शोधून कामाला लागा - आ. जयंत आसगावकर

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : अपयशाने खचून न जाता चुका शोधून कामाला लागा आणि यश मिळवा, तसेच सकारात्मक विचार करा. असे मत शिक्षक आमदार जयंत आसगावकर यांनी येथे प्रतिपादन केले. खेड तालुका माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ व आयआयबी करिअर इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गुणवंत विद्यार्थी गुणगौरव समारंभात ते बोलत होते. यावेळी व्यासपिठावर आमदार बाबाजी काळे, शिक्षण विस्ताराधिकारी जीवन कोकणे, आयआयबी करिअर इन्स्टिटयूट पुणे विभागाचे संचालक ॲड. महेश लोहारे, जिल्हा मुख्याध्यापक संघाचे सचिव शिवाजी कामठे, हरिश्चंद्र गायकवाड, उत्तम पोटवडे, शांताराम पोखरकर, मधुकर नाईक, खेड मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष संजय बोरकर, सचिव रामदास पवार, रामदास व्यवहारे, दत्तात्रय मांजरे, अंकुश सांडभोर, रामदास रेटवडे, योगेश माळशिरसकर, विलास आदलिंगे, सतीश देवरे आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना आसगावकर म्हणाले, शिक्षकांचा, विद्यार्थी आणि पालकांचा लोकप्रतिनिधी म्हणून ग्रामिण भागातील सर्व शाळांना प्रिंटर आणि भौतिक सुविधा देण्याचे काम करत आहोत. याशिवाय शिक्षकांचे विविध प्रश्न सोडविण्याच्या प्रयत्न आजतागायत केला आणि सर्व प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध राहील असेही ते म्हणाले.

# पीएमपीएल सेवकांचा सेवापुर्ती सोहळा उत्साहात साजरा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड च्या प्रदीर्घ सेवेतून निवृत्त होणाऱ्यांचा कर्मचाऱ्यांचा सेवापुर्ती निमित्त सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने मा रावसाहेब वाघ असिस्टंट टॉपिक इन्स्पेक्टर सेवा 28वर्ष, शिवाजी थोरात वाहतूक नियंत्रक सेवा39 वर्ष, श्री मनोज बर्गे वाहतूक नियंत्रक सेवा 36 वर्षे या सेवकांचा सन्मान सोहळा सीताई गार्डन या ठिकाणी नटराज स्थानक च्या दुपार सत्रातील सर्व कर्मचाऱ्यांना मार्फत हा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला .




पीएमपीएल ची सेवा तसे पाहिले तर अत्यावश्यक सेवा असून प्रवाशांना तत्पर व वेळेत सेवा देण्यासाठी अनेक वेळा स्वतःचा विचारही कर्मचारी करत नाहीत सेवा बजावत असतात प्रवासी हा केंद्रस्थानी मानून सर्व कर्मचारी काम करत असतात

या सेवापूर्ती सोहळ्यामध्ये या तिन्ही सत्कारमूर्तींना पुणेरी पगडी शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार नटराज स्थानक सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने करण्यात आला. यावेळी बहुसंख्य कर्मचारी अधिकारी सर्व कामगार मोठ्या संख्येने त्यांना शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाहक समाजसेवक तानाजी कांबळे यांनी केले यावेळी बोलत असताना कांबळे पुढे म्हणाले की कर्मचारी असताना काम करणे आणि अधिकारी झाल्यानंतर काम करणे यात मोठा फरक होत असतो पण या तिन्ही अधिकाऱ्यांनी सर्वांना सोबत घेऊन सर्वांच्या सहकार्याने मनमिळाऊपणाने अगदी सर्व कर्मचारी आपले सहकारी असून सार्वजनिक सेवा काम सर्वांच्या सहकार्यातून होत असते आणि ते करून घेणे हे फार मोठे जबाबदारीचे काम असते या तिन्ही अधिकाऱ्यांनी काम करत असताना नवीन कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कामाची जबाबदारी व प्रवाशांना कशाप्रकारे आपण सेवा दिली पाहिजे याबाबत नेहमीच मार्गदर्शन केले.

या वेळी नटराजस्थानक प्रमुख सोपानराव जांभळे साहेब श्री ओंकार पवळे, कोंडीबा काळभोर हेडकॉटर क्रमांक एकचे श्री खांडरे श्री गंगावणे श्री जायभाय उपस्थित होते.

पुणे मुन्सिपल बँकेचे संचालक बाबुल नेटके, इंटेक् चे अनपूर साहेब व इतर अधिकाऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त केली. त्यांना पुढील भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या यावेळी हे तीनही कर्मचारी भावनिक झाल्याचे सर्व कर्मचाऱ्यांना पाहायला मिळाले. या कार्यक्रमासाठी सर्व चालक वाहक अधिकारी कर्मचारी, निवृत्त सेवक कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

## लग्नाच्या बहाण्याने १ लाख ६० हजारांची फसवणूक

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

लग्न जमविण्याच्या बहाण्याने खेड तालुक्यातील एका शेतकऱ्याची १ लाख ६० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी खेड पोलीस ठाण्यात लग्न जमविणाऱ्या महिलांच्या टोळीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खेड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी आनंदा सयाजी जैद (वय ६०, रा. जैदवाडी, ता. खेड ) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ज्योती संतोष तांबोळी (वय ४०, रा. वडगाव सहाणी, ता. जुन्नर ) या महिलेने सुवर्णा उत्तम गव्हाणे (वय २८, रा. उमरगा, जि. धाराशिव) हिच्यासोबत फिर्यादींचा मुलगा स्वप्नील (वय २८) याचे लग्न जमविण्याचे आमिष दाखवले. यासाठी ज्योती तांबोळी, सुवर्णा गव्हाणे, तसेच सुवर्णाची मामी अनुसया राजेंद्र मोरे (वय ५०, रा. उमरगा, जि. धाराशिव) आणि मावशी मनीषा बाळू कदम (वय ४५, रा. यशवंत कॉलनी, निलंगा, जि. लातूर) यांनी संगनमत करून फिर्यादीकडून १ लाख ६० हजार रुपये घेतले.

दरम्यान, दि. २२ एप्रिल २०२५ रोजी दुपारी २ वाजेपासून ते २५ एप्रिल २०२५ रोजी पहाटे ५ वाजेपर्यंतच्या कालावधीत जैदवाडी (ता. खेड) येथे घाईघाईने लग्न जमवून लगेच लावून देण्यात आले. मात्र, लग्नानंतर मुलगी पळून गेली.

## कृष्णाजीनगर नऱ्हे परिसरात रस्त्यावर वाहतात ड्रेनेज

- **तातडीने नवीन ड्रेनेज लाईन टाका ; मोरे यांची मनपाकडे मागणी**

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

अनेक समस्यांनी त्रस्त असलेल्या नऱ्हे भागातील नऱ्हे कृष्णाईनगर परिसरामध्ये चेंबरचे झाकण तुटले. आणि सगळीकडे आणि त्यातून सर्वत्र मैलापाणी वाहू लागले.

इकडे कोणाचं लक्ष नाही अशी अवस्था नित्य क्रमाने दिवसभर रस्त्यावर वाहणारे ड्रेनेज मुळे परिसरातील नागरिकांना नरक यातना भोगावे लागत लागल्या. ह्या बाबत परिसरातील नागरिकांनी सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांची भेट घेऊन



या भागातील चेंबर दुरुस्ती व ड्रेनेज काम तातडीने करण्यासाठी मागणी केली. त्यावेळी मोरे यांनी प्रत्यक्ष "ऑन दि स्पोर्ट"मनपा अधिकाऱ्यांना बोलावून जनतेच्या समस्याना वाचा फोडली. कृष्णाई नगर भागात ड्रेनेजची समस्या काही केलं सुधारतच न नसल्याने सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी एवढे दिवस रस्त्यावर ड्रेनेज वाहून ही दुर्लक्ष करणाऱ्या पुणे मनपाच्या अधिकाऱ्यांना फैलावर घेतले.

त्यानंतर तातडीने झेट मशीन बोलवून नालेसफाई करण्यात आली. लवकरच ड्रेनेजचे झाकण टाकण्यात येईल असे अधिकाऱ्याने सांगितले.

भागातील वाढलेले नागरिकीकरण पाहता नवीन ड्रेनेज लाईन क्रम प्राप्त आहे. मोरे यांनी पाठपुराव्यातून केलेल्या दोन कोटी रुपयांच्या ड्रेनेज काम पूर्णत्वास येत आहे. गोकुळ नगर ते कृष्णाई नगर ही लाईन होणे गरजेचे आहे.

आणखीही निधी या भागातील ड्रेनेज कामासाठी लागणार आहे.

> **“महानगरपालिकेला नक्की जाग तरी कधी येणार आहे नऱ्हेभागात राहणारे रहिवासी ही जनावरं नसून माणस आहेत. याचा प्रत्यय तरी यांना येतोय का नाही. या भागातील जनतेची मते घेणाऱ्या लोकप्रतिनिधीं काम करता तरी काय? जनतेच्या समस्या कडे दुर्लक्ष न करता या भागातील समस्येचे निराकरण करणे गरजेचे आहे. नवीन ड्रेनेज लाईन साठीही नक्कीच पाठपुरावा करणार आहे.”** **- भूपेंद्र मोरे ,सामाजिक कार्यकर्ते**

## “तेरे मेरे बीच मे!” - चाकणकर आणि देसाई एकाच मंचावर, चर्चेला उधाण!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सामाजिक कार्य आणि महिला हक्कांसाठी नेहमी चर्चेत असणाऱ्या दोन सशक्त महिला - महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर आणि सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई - या पुण्यातील एका कार्यक्रमात एकाच मंचावर एकत्र आल्या.

ही घटना अनेकांसाठी आश्चर्याची ठरली. कारण मागील काही महिन्यांपासून तृप्ती देसाई यांनी महिला आयोगाच्या कार्यपद्धतीवर आणि निर्णयक्षमतेवर सातत्याने प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. त्यांनी विविध माध्यमांतून आयोगावर थेट टीका करत, महिला आयोगाकडून महिला संबंधित प्रश्नांवर होणाऱ्या दुर्लक्षावर आवाज उठवला होता.

पण, जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सामाजिक कार्यकर्ते



प्रतिक गंगणे, व्यवस्थापकीय संपादक

शशिकांत कांबळे यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात दोघींची अचानक भेट झाली. या वेळी एकाच व्यासपीठावर त्यांची उपस्थिती ही उपस्थितांना आश्चर्यचकित करणारी ठरली.

कार्यक्रमात दोघी ज्या क्षणी एकत्र दिसल्या, त्या क्षणी उपस्थितांनी क्षण टिपण्यासाठी मोबाईल उचलले. काही क्षणांमध्येच त्या दोघींचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला. या फोटोंसह "तेरे मेरे बीच मे!" अशा सूचक मथळ्यांसह चर्चेचा विषय बनला.

कार्यक्रमातील सामूहिक फोटोमध्ये रूपाली चाकणकर आणि तृप्ती देसाई एकत्र उभ्या असल्याने उपस्थितांनी लगेचच ‘त्या काय बोलत असतील बरं?’ असा प्रश्न उपस्थित केला. विशेषतः त्यांच्या भूतकाळातील सार्वजनिक मतभेद लक्षात घेता, हा फोटो राजकीय आणि सामाजिक वर्तुळात मोठ्या चर्चेचा विषय ठरला आहे.

महिला हक्क, सामाजिक न्याय आणि कार्यपद्धतीतील पारदर्शकतेच्या मुद्द्यांवर कार्यरत असलेल्या या दोन महिलांचा एकत्र आलेला क्षण भविष्यकाळात कोणते संकेत देतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. सामाजिक क्षेत्रात मतभेद असले तरी संवादाचे दरवाजे उघडे ठेवले जात आहेत, हेच कदाचित या भेटीतून अधोरेखित झाले असेल.

### ‘तेरे मेरे बीच मे...’ - तणाव कि संवाद?

**कार्यक्रमादरम्यान दोघी एकमेकींशी काहीसा संवाद साधताना दिसल्या. त्यांनी काय बोललं याबद्दल कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही, मात्र त्या चर्चेचा विषय अनेकांच्या चर्चेत आहे. काही सूत्रांच्या मते, कार्यक्रमाच्या निमित्ताने दोघींमध्ये सौहार्द निर्माण झाल्याचे दिसले. तर काहींच्या मते, ही केवळ औपचारिक भेट होती आणि कोणतीही सौम्य चर्चा झाली नसावी.**

# “प्रवाशांचा अधिकार : माहितीसह प्रवास निवडण्याचं स्वातंत्र्य”

**प्रवाशाने जेव्हा कोणत्याही फ्लाइट, ट्रेन किंवा बसमधून प्रवास करायचा निर्णय घेतो, तेव्हा त्याच्या डोळ्यांसमोर वेळ, किंमत आणि सेवा यांचाच विचार असतो. पण एक अत्यंत महत्त्वाचा घटक आपण अनेकदा गृहीत धरतो – तो म्हणजे त्या वाहनाचं मॉडेल आणि ते कधी तयार झालं आहे याची माहिती.**

● प्रा. योगेश हांडगे,
सहाय्यक प्राध्यापक
संगणक विभाग.●
● पत्ता: कात्रज, जि. पुणे●
● मोबाईल नंबर
9423077963 ●



**(दै. आरंभ पर्व)**

आज आपण स्मार्टफोन, गाडी किंवा अगदी टीव्ही घेताना सुद्धा त्याचं मॉडेल, मॅन्युफॅक्चरिंग डेट, परफॉर्मन्स रेटिंग आणि फॉल्ट हिस्ट्री तपासतो. पण जी वाहने आपला जीव घेऊन एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेतात — त्यांची माहिती का लपवली जाते?

विमानाच्या मॉडेलची पार्श्वभूमी : बहुतेक विमान कंपन्या Boeing, Airbus, Embraer अशा प्रख्यात कंपन्यांची विमाने वापरतात. मात्र काही मॉडेल्सवर निर्मिती दोष सिद्ध झाले आहेत.

उदाहरणार्थ : Boeing 737 MAX: २०१८-१९ मध्ये दोन मोठ्या अपघातांमध्ये सुमारे ३४६ जणांचा मृत्यू झाला. नंतर हे मॉडेल काही काळासाठी जगभरात ग्राउंड केलं गेलं. यामागे मुख्य कारण होतं – MCAS सिस्टीममधील बिघाड.

प्रवाशांना जर या विमानाचं मॉडेल आणि ते किती वर्षं जुने आहे हे कळालं असतं, तर अनेकांनी तो फ्लाइट घेण्याचा निर्णय बदलला असता.

ट्रेनचे डबे आणि इंजिन मॉडेल्स : भारतातील रेल्वे व्यवस्था प्रचंड मोठी आहे. ICF डबे, LHB डबे, Vande Bharat, WAP आणि WAG सिरीज इंजिन्स — ही सगळी मॉडेल्स वेगवेगळ्या तंत्रज्ञानावर आधारित आहेत.

ICF डबे (जुन्या डिझाईनचे): ७० किमी/तास वेगानंतर सुरक्षित नसतात. अपघात झाल्यास डबे एकमेकांवर चढतात. तरीही आजही अनेक ट्रेनमध्ये हे वापरले जातात.

LHB डबे: नवीन यंत्रणा, अपघात झाल्यास कमी इजा. पण प्रवाशांना ट्रेनमध्ये बसताना हे डबे आहेत की ICF हे कळत नाही.

अनेक प्रवाशांना विशिष्ट इंजिनमधून धूर येतोय, आवाज जास्त आहे किंवा ब्रेक्स अचानक लागत नाहीत असे अनुभव येतात — हे सगळं त्या इंजिनच्या मॉडेलवर अवलंबून असतं.

बस सेवेतील धोके : खासगी बस कंपन्या, MSRTC किंवा इतर राज्य परिवहन महामंडळांकडून वापरल्या जाणाऱ्या बसेस देखील अनेक वेळा जुनी, अपूर्ण देखभाल झालेली किंवा डिझाइन दोषांनी ग्रस्त असतात.

व्हॉल्वो B7R, Ashok Leyland Viking, Tata Marcopolo यांसारखी अनेक मॉडेल्स बाजारात आहेत.

एखादी बस १५ वर्षांपूर्वी तयार झाली असली, तरी ती अजून रस्त्यावर धावत असते. पण तिचे ब्रेकिंग सिस्टिम, सस्पेन्शन आणि इंधन प्रणाली जुन्या असतात.

उदाहरण: २०२२ मध्ये पुण्याहून औरंगाबादला जाणारी एक खासगी बस ब्रेक फेल होऊन दरडीत आदळली — तपासात कळालं की ती बस २००८ ची होती आणि तिच्या ब्रेक सिस्टीमवर कोणतीही सेवा गेल्या ५ वर्षात झालेली नव्हती.

प्रवाशांना माहिती देणे — का गरजेचे आहे?

जीवनाचा अधिकार: प्रवास सुरक्षित राहणं ही प्राथमिक गरज आहे.

निवडीचं स्वातंत्र्य: प्रवाशी त्याच्या जीवाच्या सुरक्षेसाठी निर्णय घेऊ शकतो.

गोपनीयतेची गरज नाही: वाहनाचं मॉडेल किंवा त्याचं वय गोपनीय माहिती नसून सार्वजनिक असायला हवी.

तांत्रिक दोष लपवले जातात: काही वेळा जुनं मॉडेल असल्यामुळे वारंवार बिघाड होतो, पण कंपनी ते लपवते.

वाहन तांत्रिकदृष्ट्या योग्य आहे का? – हे प्रवाशांनाही समजायला हवं.

हवंय एक पारदर्शक सिस्टिम:

जर आपण टिकट बुक करताना खालील माहिती मिळाली, तर काय बदल होईल?

**विमानाचं मॉडेल: Airbus A320neo**
**निर्मिती: जून २०१८**
**अंतिम मेंटेनन्स: मे २०२५**
**एअरलाइन सेफ्टी रेटिंग: ८.९/१०**
**अलीकडील तांत्रिक तक्रारी: नाहीत**

हे वाचून प्रवाशाने निर्णय घेणे सहज होईल. तो फ्लाइट बदलेल, वेळ बदलेल किंवा दुसरी कंपनी निवडेल — पण ते त्याचं अधिकार असेल.

कायदेशीर दृष्टिकोन : भारतीय नागरी उड्डाण महासंचालनालय (DGCA), रेल्वे मंत्रालय आणि RTO ही विभागे तांत्रिक तपासणी करतात. पण ती माहिती फक्त आतल्या फाइलांपुरती मर्यादित असते.

युरोपमध्ये किंवा अमेरिकेत विमान, ट्रेन यांची माहिती open data म्हणून उपलब्ध असते. Flightradar24, Trainspotting apps, Bus depot APIs यावरून ही माहिती अगदी स्मार्टफोनवर दिसते.

प्रवाशांच्या मागण्यांचा आवाज : मोबाईल ॲपमध्ये माहिती हवी: IRCTC, RedBus, MakeMyTrip यांसारख्या ॲप्समध्ये ‘व्हेइकल डिटेल्स’ टॅब.

बुकींगच्या वेळी खुली माहिती: कोणतं मॉडेल, किती वर्ष जुनी आहे, किती अपघात किंवा बिघाड झाले आहेत.

सेफ्टी स्कोअर आणि रिव्ह्यू: इतर प्रवाशांनी दिलेली रेटिंग्स.

गुप्तता नको — जीव महत्वाचा!

सरकार आणि तंत्रज्ञानाची भूमिका:

AI आधारित सेफ्टी स्कोअर सिस्टीम तयार करता येईल.

QR कोड स्कॅनिंगवरून वाहन माहिती सहज मिळेल.

RTI द्वारे माहिती उघड करणे हे प्रवाशाचं हक्क आहे.

केंद्र सरकारचा नवीन मोटार व्हेइकल सुरक्षा नियम यामध्ये हा घटक समाविष्ट केला जाऊ शकतो.

निष्कर्ष : आजचा प्रवासी केवळ प्रवासी नाही — तो जागरूक ग्राहक आहे. वाहनाचं मॉडेल, वयोमान आणि तांत्रिक स्थिती ही माहिती त्याला मिळाली पाहिजे. तसंच त्यावरून निर्णय घेण्याचं स्वातंत्र्य मिळालं पाहिजे.

बिगर-तांत्रिक वाटणारी ही मागणी प्रत्यक्षात आपल्या जीवन-मरणाच्या निर्णयाशी निगडित आहे.

शेवटची नोंद : “ज्यांना वाहन चालवायचं आणि प्रवासाच स्वातंत्र्य आहे, त्यांना ते वाहन कसं आहे हे माहिती करून घेण्याचा हक्क नाकारता कामा नये.”

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.